अग्निकर्म! अग्निकर्म !! अग्निकर्म!!!
गुडघेदुखी, खांदे दुखी, टाच दुखी, मानदुखी, कंबरदुखी, टेनिस एल्बो, स्पोर्टस इंजुरी, मणक्यातील गॅप इत्यादीवर जादूप्रमाणे कायमचा उपचार (कायमचे नाहीसे करा)
नो साईड इफेक्ट्स
मोफत तपासणी शिबीर
स्थळ : नान्नजकर हॉस्पिटल, दमाणी नगर, सोलापूर
वेळ :रविवार दि. 7.12.2025 रोजी सकाळी 10 ते 1
तज्ञ डॉक्टर :डॉ. सौ. ऋतुजा काटोटे
मोबाईल : 9850558343/9325584266

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १२२ वा | मंगळवार, दि. ०९ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत!

## सोलापूरात नुकसानभरपाईला मंजुरी पण शेतकऱ्यांच्या खात्यावर काहीच नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे होत्याचे नव्हते झालेल्या शेतकऱ्याला धीर देण्यासाठी आणि नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात मराठवाड्यात येऊन गेले. या पथकाला येऊन एक महिना उलटला तरी केंद्राला काय अहवाल दिला आणि त्या दौऱ्याचे फलित काय, हा विषय अजूनही अनुत्तरित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आलेला दौरा हा केवळ त्यांना शांत करण्यासाठी होता काय, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**केंद्रीय पथकात कोण होते?**

सदरील पथकाचे नेतृत्व केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडेय यांनी केले होते. अतिवृष्टीग्रस्तांना एनडीआरएफच्या (NDRF) निकषानुसार मदत दिली जाते. केंद्रीय पथकाच्या पाहणीनंतर केंद्र सरकार मदतीची ही रक्कम राज्य सरकारला देईल.

**अहवालाची प्रतीक्षा**

जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर पंचनामे करून अहवाल राज्य सरकारला सादर केला. राज्य सरकारनेही




सर्व निकष बाजूला ठेवत मदत जाहीर केली. त्यानंतर केंद्राने मराठवाड्यातील नुकसानीची पाहणी करण्यासाठी हे पथक पाठवले.

पथकातील सदस्यांनी भेटी दिल्यावर लवकरच अहवाल सादर करणार असल्याचे सांगत काढता पाय घेतला.

हा दौरा केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी होता, असा आरोप विरोधकांकडून केला जात होता.

दरम्यान, राज्यात सर्वाधिक नुकसान मराठवाड्यात झाले असल्याने, केंद्रीय पाहणी पथकाचा अहवाल केंद्राकडे सादर झाला की नाही, याबद्दल एक महिना उलटूनही स्पष्टता नाही, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. (पान 2 वर..)




# 18 पैकी 18 जागांवर दणदणीत विजय

## डोळ्यात अश्रू, कंठ दाटला

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्यात सध्या निवडणुकीचे वातावरण आहे. अशातच आता बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचा निकाल जाहीर झाला आहे. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या पॅनलने एकहाती विजय मिळवला आहे.

18 पैकी 18 जागेवर माजी आमदार राजेंद्र राऊत गटाचे उमेदवार विजयी झाले आहे. विद्यमान आमदार दिलीप सोपल यांच्या गटाचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. 18 जागांपैकी



16 जागांवर निवडणूक झाली होती. त्याआधी 2 उमेदवारांची बिनविरोध निवड झाली होती. माजी आमदार राजेंद्र राऊत गटाच्या कार्यकर्त्यांकडून गुलाल उधळत फटाके फोडत जल्लोष करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**विजयाचे श्रेय मतदारांना...**

माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी या विजयानंतर म्हटले की, 'या विजयाचे श्रेय मतदारांना जाते. बाजार समितीची ही निवडणूक सहकार क्षेत्रातील कठीण परीक्षा होती. सोसायटी, ग्रामपंचायत, आणि व्यापारी बांधवांनी सहकार्य केले. हमाल-तोलार मतदारसंघातून बिनविरोध निवड झाली. या ताकतीच्या जीवावरती आज 18 पैकी 18 उमेदवार या ठिकाणी निवडून आले आहेत. आता आम्ही बार्शीच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत.' (पान 2 वर..)












## संपादकीय

# प्रश्न दिवाळखोरीचा, उत्तर कुंभमेळ्याचं का?

राज्यातील आर्थिक परिस्थितीची जी यादी नागरिकांच्या तोंडून दररोज ऐकू येते. कंत्राटदारांची देणी थकवणे, प्राथमिक शाळांना आवश्यक निधी न देणे, मेडिकल कॉलेजांत प्राध्यापक भरती थांबणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांत औषधांचा तुटवडा, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अडकणे ही फक्त आकडेवारी नाही; हे राज्यकारभाराचे आरसे आहेत. या आरशात दिसणारी प्रतिमा धूसर नाही, ती धडधडीत स्पष्ट आहे: आर्थिक प्रशासन गोंधळले आहे.

मुख्यमंत्र्यांनी केलेले विधान, 'आर्थिक परिस्थिती बिकट असली तरी दिवाळखोरी नाही' हे जरी दिलासा देण्याचा प्रयत्न असला तरी प्रत्यक्षात तोच कबुलीजबाब अधिक चिंताजनक ठरतो. सरकारने स्वतः मान्य केलेली 'बिकट परिस्थिति' ही साधी गोष्ट नाही. पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय या सर्व क्षेत्रांमध्ये सरकारला किमान खर्चही करता येत नाही, आणि हे दिवाळखोरीचे लक्षण नाही तर मग कोणते?

याउलट, सरकारचे प्राधान्यक्रम वेगळेच दिशादर्शक आहेत. उत्सव, महागडे सरकारी सोहळे, प्रकल्पांची गाजावाजा-आधारित घोषणाबाजी ही 'दिखावापूर्ण आर्थिकता' लोकांना समजून गेली आहे. लोकांच्या पैशावर चालणाऱ्या सरकारने लोकांच्याच मुलांच्या शाळांसाठी, औषधांसाठी व शिष्यवृत्तीसाठी 'पैसे नाहीत' असे म्हणणे हे व्यवस्थापनातील गंभीर अपयशाचे स्पष्ट निदर्शक आहे.

यामुळे विरोधी पक्षांवर आता मोठी जबाबदारी येते. केवळ टीका करून किंवा जाहीर सभांत घोषणाबाजी करून हे प्रश्न सुटत नाहीत. राज्याच्या वर्तमान आर्थिक परिस्थितीवर 'श्वेतपत्रिका' मागण्याचा त्यांचा आग्रह आता अपरिहार्य आहे. शासनाने वास्तविक आकडे, कर्जदर, महसूल स्थिती, खर्चाची प्राधान्ये, अनुदानांचे वितरण आणि कर्जबाजारीपणाचा तपशील जनतेसमोर ठेवला नाही, तर जनतेला फक्त शब्दांचा धूरच मिळणार.

सरकारने जनतेला उत्सव आणि कुंभमेळ्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला, तरीही नागरिकांनी व प्रसारमाध्यमांनी मात्र मुद्दा सोडता कामा नये. प्रश्न दिवाळखोरीचा आहे. हा प्रश्न टाळून 'सर्व ठीक आहे' असे सांगणे म्हणजे फक्त सत्यावर पडदा टाकणे. आणि आर्थिक संकटाला झाकून ठेवण्याची किंमत शेवटी विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण, आणि सामान्य करदातेच भरतात.

राज्यशासनाकडे आज सर्वात जास्त गरज आहे पारदर्शकतेची. आणि जनतेकडे सर्वात मोठी गरज आहे उत्तरदायित्वाची मागणी करण्याची. सरकारने आकडे स्पष्ट करावेत; आणि विरोधकांनी ते स्पष्ट करवून घेण्यासाठी दबाव निर्माण करावाच.

कारण प्रश्न साधा आहेः कुंभमेळा कितीही भव्य असू दे, लोकांना हवे उत्तर मात्र दिवाळखोरीचे आहे.

# भ्रष्टाचार देशाला लागलेली किड

९ डिसेंबर, दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहे. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे.

भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही.

अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे.

असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत.

त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.

ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे.

राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# रूढी मोडा, प्रगती करा

रूढिरेव बलीयसि अर्थात 'रूढीं भयंकर बलिष्ठ असतात. हे नुसतं ऐकून, होकारार्थी मान हालवून फारसं कळणार नाही; त्यासाठी अनुभव घेण्याची तयारी ठेवल्यास त्यांची राक्षसी ताकद नक्की कळेल. वटसावित्रीच्या व्रतामध्ये काही अर्थ नसतो. कारण आत्मा, यमराज, पुनर्जन्म आदि सफेद झूठ आहेत, असं लेक्चर कॉलेजात देणाऱ्या प्राध्यापिका कॉलेज सुटताच वटवृक्षाला सूत गुंडाळून फेऱ्या घालताना दिसतात. रूढी ह्या राक्षसी आहेत, हे कळतं पण त्यांच्या विळख्यातून कसं सुटावं हे मात्र कळत नाही. कळतं पण वळत नाही असा हा सारा गचाळ मेंदूचा कारभार आहे. म्हणूनच विद्वान रूढिरेव बलीयसि म्हणून माथा ठोकत गप्प बसतात.

लोकांच्या रूढिप्रियतेचं रहस्य सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात, 'प्रत्येकाच्या मेंदूत विचाररेषा असतात. पण नव्या नव्या विषयावर बोलल्याशिवाय त्या रेषा स्पष्ट होत नाहीत. ज्या विचारशील, स्पष्टवक्त्यांनी विचार करून, बोलून ह्या रेषा स्पष्ट, ठळक केल्या ते रूढीच्या कचाट्यातून सुटतात. मात्र ज्यांनी रूढींची चिकित्साच केली नाही, त्यांच्यातील दोषांवर बोलण्यासाठी तोंड उघडलं नाही, ते लोक रूढिप्रियच असतात. लोकांच्या रूढिप्रियतेचं गुपित हे असं आहे.' रूढी म्हणजे धर्म नव्हे. रूढींचं पालन केलं नाही म्हणजे काही धर्म बुडत नाही (आणि जरी धर्म बुडाला तरी काही आपण मरणार नाही.). त्याविषयीसुद्धा स्वामीजी म्हणतात, 'ज्याला आपण धर्म म्हणतो तो क्षुद्र, खुळचट रूढींमध्ये सामावलेला आहे. (उदा. वटसावित्री व्रत, शनिमहात्म्य वाचणे, गुढी उभारणे, होळी इत्यादि) स्थानिक रूढी असंख्य आहेत. पण रूढी म्हणजे खरा धर्म असं अज्ञानी लोक मानतात. ती त्यांची फार मोठी चूक असते. स्थानिक, खुळचट रूढींना वेद, स्मृती वा पुराण कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म कुणाचाच आधार नसतो. पण अज्ञ लोक धर्म बुडण्याच्या भीतीपोटी त्यांचं पालन करतात. रूढींचा त्याग केल्याने चांगला माणूस होता येतं, हेही त्यांना कळत नाही. आज एखाद्या खेड्यातील क्षुल्लक रूढी ही उपनिषदाच्या उपदेशापेक्षा श्रेष्ठ मानली जात आहे.'

'पण लक्षात कोण घेतो' ही ह. ना. आपटे यांनी कादंबरी खळबळ माजवून गेली. कादंबरीची नायिका यमू ही दुष्ट शंकरमामंजीच्या केश- वपनाच्या रूढिप्रियतेची बळी झाली. त्याकाळी पतिनिधनानंतर ब्राह्मण विधवा स्त्रीचे केस काढून तिला बोडकी करीत. आज ही रूढी मोडीत निघाली म्हणून काही सनातनी ब्राह्मणांचंही घोडं कुठं अडलं नाही. संत तुकडोजी यांनी ग्रामगीतेत रूढीपालनाचा उपहास केला आहे. ते म्हणतात,

स्वये म्हणवी राम भक्त ।
नाही एकपत्नीव्रत ।
नित्य पूजितो हनुमंत ।
व्यसने झाला प्रेताऐसा॥


पाडव्यादिवशी द्युत (जुगार खेळण्याची रूढी आहे. त्याविषयी ते म्हणतात,

काही पाडवा जुगार खेळती ।
ही आहे समाजाची अधोगती ।
काही लोक जिंकोन जाती ।
काही हरती वस्त्रेही ॥

रूढी ह्या अजर, अमर, चिरंतन, सनातन नसतात. बऱ्याच जुन्या रूढी नष्ट होतात तर बऱ्याच नव्या रूढी मूळ धरतात. विवेकानंद म्हणतात, 'श्रुतींमध्ये ईश्वर, जीव इत्यादी विषयांवरील सत्ये असतात. पण स्मृतींमध्ये विशिष्ट स्थानी, विशिष्ट परिस्थितीत आचरण्याची कर्तव्यं सांगितलेली असतात आणि म्हणूनच ती कालमानानुसार बदलतात. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे धर्म बुडत नाही. उदा. वेदकाळी गोमांस खाणाराच ब्राह्मण समजला जाई. पण कृषिविकासामुळे गाईचं महत्त्व वाढलं. कारण बैलांची पैदास तिच्याशिवाय शक्य नव्हती म्हणून ती रूढी बंद पडली.'

एकादशी करण्याची रूढी महात्मा चक्रधरांनी मोडली. ग्रंथ संस्कृत भाषेतच लिहावेत, ही रूढी ज्ञानदेवांनी मोडली. नवसांची रूढी तुकोबांनी मोडली, (नवसे कन्या-पुत्र होती, तर का करणे लागे पती? असा रोकडा प्रश्न त्यांनी विचारला.) अंत्यज पोर कडेवर घेऊन एकनाथांनी अस्पृश्यतेची रूढी मोडली. देव आणि भक्त यांच्यामध्ये भट-दलाल नको म्हणून महात्मा जोतिरावांनी रूढिभंग केला. सती प्रथा राजा राममोहन रॉय यांनी मोडीत काढली. राजर्षी शाहूंनी पुराणोक्त मंत्रांची रूढी मोडून काढली. हे सारे रूढिभंजक समाजावर अनंत उपकार करून गेले. पण समाज हा या सर्व थोरांच्या रूढीभंजक वृत्तीचे अनुकरण करतोय का? रूढिप्रिय देश चिखलात रुतलेल्या हत्तीसारखा असतो. आपणाला प्रगती करायची असेल तर रूढींच्या चिखलातून आपण शक्य तितिक्या लवकर बाहेर पडलं पाहिजे. कारण-

रूढिराक्षसींनी । किती लोक खाल्ले
किती हाल केले । काय सांगू ॥१
रूढी छळतात । रूढी पिळतात
रूढी गिळतात । समाजाला ॥२
रूढी निरर्थक` अन्यायकारक
रूढी त्या मारक । भोळ्या जना ॥३
समाजहिताच्या । लावूनी कसोट्या
पहा खऱ्या-खोट्या । रूढी कशा ॥४
व्यक्तीच्या हिताला । साधक-बाधक
तारक-मारक । पाहा रूढी ॥५
अनर्थ दिसतो । ज्या ज्या रूढीमध्ये
अशा रूढीमध्ये। गुंतू नका ॥६
समाजाला मागे। नेणाऱ्या रूढींना
दूर फेकताना । नको दुःख ॥७
दुष्ट रूढींशी जो । शत्रुत्व करतो
तोच पुढे नेतो । समाजाला ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी...

### सोलापूरात नुकसानभरपाईला मंजुरी पण शेतकऱ्यांच्या खात्यावर काहीच नाही

अतिवृष्टीची १४०० शेतकऱ्यांची दोन कोटी, तर बियाणांसाठीची साडेबारा हजार शेतकऱ्यांची साडेपंधरा कोटी, असे एकूण २५ हजार ८१२ शेतकऱ्यांच्या खात्यावर १७ कोटी ७० लाख रुपये जमा झाले नाहीत.

दरम्यान, खरडून जमीन वाहून गेलेल्या ९५२ शेतकऱ्यांचे १ कोटी ४७ लाख रुपये अद्याप मंजूर झाले नसल्याचे सांगण्यात आले.

यावरून उत्तर तालुक्यातील ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याचे सव्वीस हजारांहून अधिक खात्यावर १९ कोटी रुपये जमा झाले नाहीत. उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मे महिन्यापासून नुकसान सुरू झाले.

मे नंतर ऑगस्ट महिन्यात उत्तर तालुक्यातील पाचही मंडळात अतिवृष्टी झाली. यातील काही मंडळांत सप्टेंबर महिन्यातही अतिवृष्टी झाली होती. यामुळे मे महिन्यात उन्हाळी पिकांचे, तर ऑगस्ट महिन्यात खरीप पिकांचे नुकसान झाले होते.

ऑगस्ट महिन्यात झालेल्या पंचनाम्याची नुकसानभरपाई आदेश १२ सप्टेंबर रोजी निघाला. या आदेशाला ८५ दिवस उलटले तरी १, ३८८ शेतकऱ्यांची २ कोटी ७ लाख रुपये रक्कम जमा झाली नाही.

सप्टेंबर महिन्यात झालेला पीक नुकसानभरपाई मंजूर आदेश १८ ऑक्टोबर रोजी निघाला. या आदेशानंतर दोन हेक्टरवरील व तीन हेक्टरपर्यंतचा नुकसानभरपाई आदेश २० ऑक्टोबर रोजी निघाला आहे.

# 18 पैकी 18 जागांवर...

पुढे बोलताना राऊत म्हणाले की, 'विधानसभेतील पराभवानंतर जनतेमध्ये ही भावना होती की, राजूभाऊंना ताकद देणे गरजेचे आहे. थांबलेला विकास पुन्हा सुरू करण्यासाठी हे जनतेने दिलेले आशीर्वाद आहेत. ही निवडणूक प्रतिष्ठेची नसून जनतेच्या सेवेची लढाई होती. मी कधीही माझी प्रतिष्ठा पणाला लागली म्हणणार नाही किंवा अस्तित्वाची लढाई म्हणणार नाही. ही माझ्या बार्शी तालुक्यातील जनतेची जी मला सेवा करायची त्याची लढाई आहे.'

**बार्शी तालुक्याचा विकास कधीही थांबणार नाही**

माजी आमदार राऊत पुढे बोलताना म्हणाले की, 'भले एखादा कुठला अस्तित्व किंवा प्रतिष्ठेचा विषय असल्यास 10 पाऊल मागे घ्यायची वेळ आली तरी चालेल, परंतु या बार्शी तालुक्याचा विकास कधी थांबणार नाही. या तालुक्याचा विकास करण्यासाठी मी देवेंद्र फडणवीस साहेब, शिंदे साहेब, अजित दादा आणि आदरणीय नरेंद्र मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चांगल्या पद्धतीने काम करणार आहे.'

राजेंद्र राऊत यांनी पुढे बोलताना म्हटले की, 'बार्शी तालुक्यातील जनतेला विकासाची फार मोठी अपेक्षा आहे आणि तो विकास कोणाच्या माध्यमातून पूर्ण होतोय, संपूर्ण जनतेला पूर्ण माहिती आहे. केंद्र सरकार, देवेंद्र फडणवीस साहेब, शिंदे साहेब, आणि दादा या तिन्ही नेत्यांच्या माध्यमातून विकासाची कामे पूर्ण होतील. माझे सहकारी जीवाभावाचे मित्र जयभाऊ गोरे यांनी या ठिकाणी येऊन मला आधार देण्याचे काम केले. मी त्यांचे आभार मानतो.'

# भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव

देशभरातील प्रशासन, सार्वजनिक सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायव्यवस्था आणि नागरिक, समाज यांचे पारस्परिक नाते जेव्हा भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रकरणांमुळे प्रभावित होते, तेव्हा त्याचा परिणाम केवळ आर्थिक किंवा कायदेशीर मयार्देत मर्यादित राहत नाही, तर सामाजिक संरचना, विश्वास, पारदर्शकता आणि न्याय या मूल्यांवर खोलवर दिसून येतो. २०२३ मधील National Crime Records Bureau (NCRB) च्या अहवालानुसार, भारतात राज्यातील भ्रष्टाचारविरोधी यंत्रणांकडून नोंदवलेली प्रकरणे ४,०६९ होती, ज्यात सुमारे ७१ टक्के प्रकरणे ह्लट्रॅपह्व प्रकारात होती, म्हणजे लाच देताना किंवा घेताना आरोपी रंगेहात पकडले गेले. या आकड्यांमागील वास्तव असे आहे की, भ्रष्टाचार फक्त काही प्रकरणांपुरता मर्यादित नाही; तर मोठा भाग अजूनही समाजात लपलेला आहे. ह्लट्रॅपह्व प्रकारात पकडलेली प्रकरणे हे फक्त टोकाचे उदाहरण आहेत. हजारो प्रकरणे, जिथे भ्रष्टाचार घडतो पण नोंद होत नाही, अशा व्यवहारांचा समावेश या आकड्यांमध्ये नाही. प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती, अनधिकृत शुल्क, अधिकारांवर दबाव, सेवा-परवाना प्रक्रियेत अनियमितता हे भ्रष्टाचाराचे वास्तविक रूप आहे, जे पकडले जात नाही, पण समाजावर खोल परिणाम करते.

पारंपरिक भ्रष्टाचारापेक्षा आजच्या काळात भ्रष्टाचाराचे स्वरूप बदलले आहे. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, डिजीटल फसवणूक, व्यावसायिक व्यवहारातील भ्रष्टाचार हे गंभीर प्रमाणात वाढले आहेत. २०२३ मध्ये आर्थिक गुन्ह्यांची नोंद २०२२ च्या तुलनेत ६ टक्क्यांनी वाढली, तर सायबर गुन्ह्यांमध्ये ३१.२ टक्क्यांची वाढ झाली असून, एकूण ८६,४२० प्रकरणे नोंदली गेली. या सायबर प्रकरणांपैकी अंदाजे ६९ टक्के प्रकरणे फसवणूक हेतूची होती. हे दर्शवते की डिजिटल व्यवहार, आर्थिक व्यवहार, ऑनलाईन सेवांचा दुरुपयोग हे भ्रष्टाचाराचे नवे रूप घेत आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, जेव्हा सार्वजनिक यंत्रणा पारदर्शक नसतात, उत्तरदायित्व राखत नाहीत आणि नागरिकांचा विश्वास घटतो, तेव्हा लोक वैध प्रक्रियांच्या ऐवजी अवैध मार्गांकडे वळतात. लाच, घोटाळा, प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती व्यवहार. हे फक्त व्यक्तिगत नैतिकतेचा प्रश्न नाही; ही संस्थात्मक आणि सामाजिक समस्या बनते. अशा परिस्थितीत, गरीब, अल्पसंख्याक, मागासलेले वर्ग हे सर्वात जास्त प्रभावित होतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण किंवा शहरी गरीब लोकांना सरकारी सेवा, परवाने, योजना मिळवण्यासाठी आवश्यक माहिती, संपर्क, संसाधने नसतात. त्यामुळे त्यांना अवैध मागार्चा अवलंब करावा लागतो. परिणामी, सामाजिक विषमता वाढते, न्याय कमी होतो आणि समान संधींचा अभाव निर्माण होतो. भ्रष्टाचारामुळे हे सामाजिक असमानता आणि विषमता आणखी खोलवर रुजते.

शहरी व ग्रामीण परिस्थितींचा आढावा घेतल्यास, ग्रामीण भागात भ्रष्टाचाराचे स्वरूप मुख्यतः सरकारी योजनांमध्ये घोटाळा, पंचायत स्तरावरील गैरव्यवहार, जमीन व्यवहारातील अनियमितता, परवाने मिळवण्यात रस्सीखेच इत्यादी प्रकारात दिसते. शहरी भागात भ्रष्टाचार आर्थिक व्यवहार, व्यावसायिक व्यवहार, परवाने, सार्वजनिक सेवा, ऑनलाईन व्यवहार यामध्ये अधिक प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील लोकांना माहिती व साक्षरतेचा अभाव असल्यामुळे ते अधिक प्रभावित होतात, तर शहरी भागातील लोक अधिक जागरूक असले तरी आर्थिक गती व व्यावसायिक दबावामुळे भ्रष्टाचार अधिक तंत्रसंपन्न स्वरूपात दिसतो.

आर्थिक गुन्हे आणि सायबर गुन्ह्यांमुळे फक्त व्यक्ती प्रभावित होत नाहीत, तर संस्था, उद्योग, समाज, आर्थिक व्यवहार, रोजगार, सार्वजनिक विश्वास हे सर्व प्रभावित होतात. डिजिटल व्यवहारातील फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, ऑनलाईन आर्थिक फ्रॉड हे नागरिकांचे रोजचे जीवन धोक्यात टाकतात. यामुळे सामाजिक विश्वास, आर्थिक स्थैर्य, पारिवारिक व सामुदायिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम होतो.

भ्रष्टाचाराचा एक महत्त्वाचा सामाजिक परिणाम म्हणजे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवर असलेला विश्वास घटणे. जेव्हा लोक अनुभवतात की सरकारी योजना, परवाने, सेवांमध्ये पारदर्शकता नाही, तर ते न्याय मिळवण्यासाठी किंवा आवश्यक सेवा घेण्यासाठी भ्रष्ट मार्ग स्वीकारतात. परिणामी, समाजातील नैतिक मूल्ये कमजोर होतात, पारदर्शकता आणि जवाबदारी यांचा अभाव निर्माण होतो, आणि सामाजिक ढांचा ढासळतो.

शिक्षण आणि जागरूकता यांचा अभाव देखील भ्रष्टाचार वाढवण्यास हातभार लावतो. शिक्षणात कमी, सामाजिक साक्षरतेत कमतरता, नागरिक अधिकारांची माहिती नसणे हे घटक लोकांना भ्रष्टाचाराच्या जाळ्यात सहज ओढून नेतात. जागरूक नागरिक फक्त स्वतःसाठीच नव्हे, तर सामाजिक बदलासाठीही महत्त्वपूर्ण आहेत.

संस्थात्मक दोष देखील भ्रष्टाचार वाढवतात. प्रशासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये पारदर्शक प्रक्रिया आणि जवाबदारी सुनिश्चित न केल्यास, भ्रष्टाचाराची पद्धत कायम राहते. दोषी पकडणे आणि दंड देणे आवश्यक आहे, पण पुरेसे नाही. सुधारणा ही प्रणालीत बदल, जवाबदारी वाढवणे, सार्वजनिक सहभाग सुनिश्चित करणे आणि सामाजिक मूल्यांची प्रतिष्ठा करण्यामध्ये आहे.


डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ऑनलाईन फसवणूक, आर्थिक फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, आर्थिक फ्रॉड हे सर्व नागरिकांसाठी गंभीर धोका आहेत. डिजिटल सुरक्षा, साक्षरता, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि तत्पर न्यायव्यवस्था ह्या उपाययोजना करता येतील.

जागतिक दृष्टिकोनातून पाहता, भ्रष्टाचार ही एक सार्वत्रिक समस्या आहे. आंतरराष्ट्रीय पारदर्शकता (Transparency International) च्या अहवालानुसार, भारताचा भ्रष्टाचार संदभार्तील जागतिक स्थान स्थिर आहे, परंतु विविध राज्यांमध्ये बदल मोठ्या प्रमाणावर आहेत. भ्रष्टाचाराविरोधी धोरणे, प्रशिक्षण, डिजिटल ट्रॅकिंग, पब्लिक फॉरम्स आणि नागरिकांचा सहभाग हे उपाय अनेक देशांमध्ये प्रभावी ठरत आहेत. भारतातही याची अंमलबजावणी आवश्यक आहे.

सामाजिक स्तरावर, भ्रष्टाचारामुळे विषमता वाढते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग, अल्पसंख्याक, महिला, वंचित समुदाय हे सर्व भ्रष्टाचाराचे बळी ठरतात. सरकारी योजनांचा लाभ मिळविणे अवघड होते, सेवांमध्ये गती नसते, आणि त्यांचे जीवनमान घटते. परिणामी, समाजातील सामाजिक असमानता अधिक खोलवर रुजते. भ्रष्टाचाराचा प्रभाव आर्थिक विकासावरही पडतो. गुंतवणूक कमी होते, व्यवसायिक वातावरण अनिश्चित बनते, सेवा वितरण धीमे होते, आणि विकासाच्या योजनांचा परिणाम कमी होतो. परिणामी, देशाची आर्थिक स्थिरता वर्धित होत नाही, तर सामाजिक आर्थिक विषमता वाढते.

भ्रष्टाचारावर मात करण्यासाठी उपाययोजना बहुआयामी असाव्यात. यात शिक्षण, जागरूकता, पारदर्शकता, जबाबदारी, डिजिटल सुरक्षा, आर्थिक न्याय, नागरिकांचा सहभाग आणि संस्थात्मक सुधारणा यांचा समावेश आवश्यक आहे. याशिवाय, सरकारी धोरणे प्रभावी करणे, ऑनलाईन सेवा सुधारित करणे, फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा मजबूत करणे, आणि दोषींवर त्वरित कारवाई करणे हे देखील महत्त्वाचे आहेत.

९ डिसेंबर रोजी असणारा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो आपली सामाजिक जबाबदारी, सार्वजनिक मूल्ये, पारदर्शकता, न्याय आणि सुरक्षित समाज यांचा आढावा घेण्याचा दिवस आहे. जर आपण फक्त दोषी पकडण्यावर अवलंबून राहिलो, तर बदल होणार नाही. परंतु, जर नागरिक जागरूक राहिले, सामाजिक मूल्यांचे रक्षण केले आणि संस्थात्मक सुधारणा केली, तरच बदल शक्य आहे. भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव फक्त आकडेवारी नाही; हे आपल्या समाजाची वास्तव स्थिती आहे. त्यावर विचार करून आणि बदलासाठी भूमिका घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजात पारदर्शकता, जवाबदारी, समान संधी, साक्षरता, डिजिटल साक्षरता, आर्थिक न्याय हे मूल्य रुजविणे आवश्यक आहे. जर नागरिक आणि संस्था यांनी एकत्र येऊन बदलासाठी काम केले, तर भ्रष्टाचार कमी होईल, सामाजिक न्याय साधला जाईल, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास सुसंगत होईल. बदल फक्त आकडेवारीत दिसला पाहिजे असे नाही, तर जीवनाच्या प्रत्येक स्तरावर अनुभवायला हवा.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## वात्रटिका

### जात शोधाचा सराव

उच्च जातीच्या शोधात
आता मुले लिहू लागली...
जात शोधून काढत त्यांनी
सराव परीक्षा दिली...
कुणी कितीही प्रयत्न करा
जात काही जाता जाईना...
अडकून बसलेत अजून तिथेच
समता कोणीच पेरीना...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# माढा मतदारसंघातील उद्योजकांना गुजरात अभ्यास दौऱ्याची सुवर्णसंधी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'खासदार नवउद्योजक विकास कार्यक्रम' या विशेष उपक्रमांतर्गत सलग दुसऱ्या वर्षी सोलापूर जिल्हा व माढा लोकसभा मतदारसंघातील नवोदित तसेच कार्यरत उद्योजक व बचतगटातील महिलांसाठी गुजरात गांधीनगर येथे 15 ते 18 डिसेंबर २०२५ यादरम्यान होणाऱ्या खाद्यखुराक 2025 प्रदर्शनासाठी अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार असल्याची माहीती शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यांनी दिली.

अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी उद्योजकांसाठी शिवरत्न शिक्षण संस्था शंकरनगर अकलूज येथे गुरुवार दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वा लेखी परीक्षा व तोंडी मुलाखत घेण्यात येणार आहे.लेखी परीक्षेचा निकाल परीक्षेनंतर त्वरित जाहीर केला जाईल, तसेच त्याच दिवशी पात्र उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. परीक्षेसाठी उमेदवारांनी आधारकार्ड आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.

गतवर्षी या अभ्यास दौऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गतवर्षी अभ्यास दौरा केलेल्या अनेक नवउद्योजक यांनी नवीन यंत्रसामुग्री खरेदी केली, व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल व इतर माहीती मिळाल्यामुळे व्यवसायात नवीन ग्राहक मिळाले एकंदरीत या उपक्रमाचा उद्देश स्थानिक उद्योजकांना आधुनिक उद्योग संकल्पना, व्यवस्थापन तंत्रे, उत्पादन प्रक्रिया आणि राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांविषयी थेट माहिती मिळवून देणे हा आहे.

या कार्यक्रमात सध्या व्यवसाय करत असलेले तसेच नवीन उद्योग सुरु करू इच्छिणारे युवक, महिला बचत गट सदस्य, व इतर इच्छुक उद्योजक सहभागी होऊ शकतात. अभ्यास दौऱ्याचा संपूर्ण खर्च आयोजक संस्थांकडून केला जाणार आहे.

या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील युवकांना स्वावलंबनाची दिशा देत उद्योजकतेकडे प्रवृत्त करणे हा मा. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा प्रमुख हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

रजिस्ट्रेशन लिंक https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSew6XfgbQmu9clk4fjlx9OpQV4PORda2PF6pJSRfa5toAKATA/viewform

**भारत साठे** - ९०११३११४०६
**तुळशीराम पिसाळ** - ९८२२१७३४५५

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलीस प्रशासनाची कारवाई : तहसिलदार- सचिन लंगुटे



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सात लाकडी होड्या तसेच थमाकीलचे तराफे महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाकडून नष्ट करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. भीमा नदी पात्रातील चिंचोली भोसे येथे चार व इसबावी येथे तीन लाकडी होड्या तसेच पंढरपूर जवळील असणाऱ्या नगरपालिका बंधाऱ्यालगत वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे थमाकीलचे तराफे नष्ट केले आहेत. सदरच्या दोन्ही कारवाई महसूल पथकाने सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान केली. या कारवाईमध्ये सुमारे आठ लाख रुपये किमतीचे अवैध गौण खनिज वाहतुकीसाठी व चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य नष्ट करण्यात आले आहे.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण व ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, गणेश पिसे, प्रमोद खंडागळे, संजय खंडागळे, योगेश कदम, विराज लोटेकर, दिगंबर डोईफोडे, सुमित जाधव, नितीन कोलगे, सागर जगताप, समीर पटेल व महेश कुमार सावंत व पंढरपूर शहर पोलीस विभागातील पाटील व सर्जे हे सहभागी होते..

# प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय समूह नृत्यस्पर्धेचे आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १२, १३ व १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत शालेय मुला-मुलींच्या व महाविद्यालयीन गटासाठी राज्यस्तरीय समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी दिली.या वेळी स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष सयाजीराजे मोहिते पाटील उपस्थित होते. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त स्मृतीभवन शंकरनगर येथे या स्पधेर्चे आयोजन केले असून सदरच्या स्पर्धा एकूण पाच गटात होणार आहेत. गट पहिला इयत्ता १ ते ४ थी कॅसेट गीत, गट दुसरा इयत्ता ५ वी ते ७ वी कॅसेट गीत (पारंपारिक लोकनृत्य), गट तिसरा इयत्ता ८वी ते१०वी ग्रामीण बॉलीवूड डान्स आणि कॅसेट गीत शहरी (पाश्चिमात्य), गट चौथा इयत्ता ५वी ते१०वी कॅसेट गीत (प्रासंगिक नृत्य थीम डान्स) व गट पाचवा इयत्ता११वी ते सर्व महाविद्यालयीन (प्रासंगिक थीम डान्स) हे गट आहेत.

शहरी गट, ग्रामीण गट अ, व ग्रामीण गट ब अशा तिन्ही गटासाठी स्वतंत्र आकर्बषक बक्षीसे असून सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. प्रताप क्रीडा मंडळाने अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, नृत्य कलाकार निर्माण केले असून आज ते विविध माध्यमांतून कार्यरत आहेत.

मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड, संजय गळीतकर, दिलीप शिर्के, विजय निंबाळकर यांच्यासह सर्व संचालक, सदस्य या स्पर्धे साठी कार्यरत आहेत.

# अनगर विद्यालयाचा राज्यस्तरीय दुहेरी विजयानं अभिमान द्विगुणित!



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाच्या वतीने विद्यार्थी व शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगर येथील विद्यार्थिनी व शिक्षिकेने मिळवलेले दुहेरी यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे.

या स्पर्धेत कुमारी सानिका संजय गुंड (विद्यार्थी गट) हिने प्रथम क्रमांक, तर शिक्षक पदवीधर गटातून ज्योती सत्यवान भडकवाड यांनीही प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाचा गौरव वाढविला. यांना सत्यवान दाढे व अर्चना गुंड यांनी मार्गदर्शन केले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे मार्गदर्शक व राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील, लोकनेतेचे चेअरमन विक्रांत पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी, मुख्याध्यापक रामचंद्र पाटील व मुख्याध्यापक संजय डोंगरे यांनी विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात प्राचार्य चंद्रकांत ढोले यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या सानिका गुंड व ज्योती भडकवाड यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

# सोमेश यावलकर यांना 'सह्याद्रीरत्न राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला नगर परिषदेचे मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत टॅलेंट कट्टा महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार सोहळा 2025 मध्ये त्यांना मानाचा 'सह्याद्रीरत्न' राज्यस्तरीय गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, भारत सरकार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय नोंदणीकृत संस्थेच्या वतीने हा पुरस्कार दिला जात आहे. मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांनी सांगोल्यात अनेक वर्षे समाजसेवा, नागरिकांच्या अडचणींचे निराकरण, युवकांसाठी मार्गदर्शन, विविध सामाजिक उपक्रम राबविणे, तसेच विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे. त्यांच्या कायार्तून प्रेरणा घेऊन अनेक युवक सामाजिक क्षेत्रात पुढे येत आहेत.

हा प्रतिष्ठित पुरस्कार सोहळा 14 डिसेंबर 2025, रविवार, पुणे येथे भव्यदिव्य कार्यक्रमात पार पडणार आहे. राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांना 'सह्याद्रीरत्न' पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या निवडीबद्दल मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांना सांगोला तालुक्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

# स्वेरीत 'इनोव्हेशन डे' आणि 'आयट्रिपलई डे' साजरा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग या विभागाच्यावतीने संस्थेचा 'नवोन्मेष दिन' (इनोव्हेशन डे) आणि 'आयट्रीपल ई डे' हे दोन्ही उपक्रम संयुक्तपणे साजरे करण्यात आले.

भारताचे माजी राष्ट्रपती आणि ह्यभारताचे क्षेपणास्त्र पुरुष' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये 'नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि उद्योजकते' विषयी प्रेरणा निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून इव्हॉल्विंग एक्स सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक अमोल नितवे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अमोल नितवे यांनी 'नवोन्मेषी विचारसरणी, स्टार्टअप संस्कृती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वास्तवातील समस्यांचे समाधान' या विषयांवर मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांनी सर्व आयट्रीपलाई संबंधित उपक्रमांचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. स्मिता गावडे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीता तळवळकर, स्वरा तासगांवकर आणि समृद्धी मोरे यांनी केले, तर आभार डॉ. दिग्विजय रोंगे यांनी मानले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# 'दयानंद'च्या कॅप्टन व्हनमाने यांची दिल्ली परेडसाठी निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दयानंद महाविद्यालयातील एन.सी.सी. अधिकारी कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने यांची दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी महाराष्ट्र कन्टीजंटचे मार्गदर्शक म्हणून निवड झाली आहे.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्यानिमित्ताने भारतातून विविध राज्यांमधून १७ एन.सी.सी. डायरेक्टर्स दिल्लीच्या संचलनासाठी निवड होत असते. यंदा इंडियन आर्मी विंग, इंडियन नेव्ही विंग, इंडियन एअर फोर्स विंग मधून महाराष्ट्रातून १२४ एन.सी.सी.छात्र दिल्ली येथे होणाऱ्या २६ जानेवारीच्या परेड संचलनासाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र एन.सी.सी.कन्टीजंटने आतापर्यंत सलग तीन वेळा संचलनात प्रथम क्रमांकाचा विजय पटकाविला आहे. याही वर्षी महाराष्ट्र कन्टीजंट उत्तम कार्य करण्यासाठी दयानंद महाविद्यालयातील कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने यांची पुणे एन.सी.सी.ग्रुप हेडकॉटरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अरविंद चौधरी, सोलापूरच्या ३८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सीचे कमांडिग ऑफिसर कर्नल एम.डी. मुत्तप्पा, अँडम ऑफिसर कर्नल देवानंद मठपती आदी अधिकारी वर्गानी निवड केली आहे.या निवडीबद्दल दयानंद संस्थेचे स्थानिक सचिव डॉ. महेश चोप्रा, संस्थेचे प्रशासक डॉ.विजयकुमार उबाळे, प्राचार्य डॉ. बी.एच. दामजी,प्राचार्य डॉ. एस. बी. क्षिरसागर, प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, उपप्राचार्य अरुण खांडेकर, सर्व प्राध्यापक वृंदानी अभिनंदन केले आहे.

# प्रहारतर्फे रितू नलवडेंचा सत्कार



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी (ता. माढा) येथील विठ्ठलराव शिंदे महाविद्यालयात कार्यरत असलेले सोमनाथ नलवडे यांची कन्या कु. रितू सोमनाथ नलवडे हिने अकोला येथील महात्मा फुले आयुर्वेदिक महाविद्यालयात बी.ए.एम.एस. (BAMS) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल प्रहार संघटनेच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला.

हा सत्कार प्रहार संघटनेचे धाराशिव व सोलापूर संपर्क प्रमुख अमोल जगदाळे व वडार पँथरचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजकुमार धोत्रे यांच्या हस्ते फेटा बांधून करण्यात आला. या कार्यक्रमास मराठी पत्रकार संघाचे माढा तालुकाध्यक्ष अनिल जगताप, टेंभुर्णी पत्रकार संघाचे हरिश्चंद्र गाडेकर, पत्रकार गणेश चौगुले, संतोष वाघमारे, धनंजय भोसले, सोमनाथ नलवडे, रमेश ढावरे आदी मान्यवर उपस्थित होते. रितू नलवडेच्या या यशाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जाहीर प्रसिध्दीकरण कि.अर्ज नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

म. जुबेर शेख
वय-२८ वर्षे. धंदा- व्यापार
रा. मोहोळ ता. मोहोळ } **अर्जदार**
**विरुद्ध**
मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा बहिणी जुलेखा मो. जुबेर शेख यांची जन्म ता.१४/६/१९९२ व अनिसाखातून मो. जुबेर शेख जन्म दि. १९/११/१९८६ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचे बहिणी म्हणजेच जुलेखा मो. जुबेर शेख व अनिसाखातून मो.जुबेर शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.१/६/१९६१ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९९२ व नोहेंबर १९८६ चे आभिलेखात अर्जदार यांच्या बहिणीची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२३/१२/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र. अभि/कावि नं. ४८६/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

श्री. हसन हबीर शेख
वय ५० वर्षे,धंदा व्यवसाय,रा.वटवटे,ता.मोहोळ,
जि. सोलापूर } **अर्जदार**
**विरुध्द**
ग्रामपंचायत वटवटे,ता.मोहोळ,(अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत वटवटे,यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची नात म्हणजेच आफिया रजाक फरास हिचा जन्म ता. २३/०६/२०२१ रोजी मौजे वटवटे, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची नात म्हणजेच आफिया रजाक फरास हिची जन्म दाखल्याची ता. २३/०६/२०२१ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून २०२१ चे अभिलेखात अर्जदाराची नात म्हणजेच आफिया रजाक फरास हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ९/१ /२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ०९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण कि.अर्ज नं.२२०/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

दादाराव विलास खांडेकर
वय-३८ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. गोटेवाडी, ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**
**विरुद्ध**
ग्रामपंचायत गोटेवाडी,
ता. मोहोळ, जि. सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचा जन्म ता.०५/०६/१९८७ रोजी मौजे गोटेवाडी, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत गोटेवाडी, ता. मोहोळ यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरिता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमूद अर्जदार यांची जन्माची नोंद ग्रामपंचायत गोटेवाडी यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरिता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्याआत अथवा दि ९/१/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजरराहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरूर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी.हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानिशी दिले असे.
दि.९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण कि.अर्ज नं.२४९/२०२४

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

श्री. अशोक कृष्णा गोटणे,
वय ६० वर्षे, धंदा पेन्शनर,
रा.आय.टी.आय.जवळ,मोहोळ,ता.मोहोळ,
जि. सोलापूर. } **अर्जदार**
**विरुध्द**
ग्रामपंचायत नरखेड,ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांची मुलगी ऋतुजा अशोक गोटणे हिचा जन्म ता. ०२/०१/२००३ रोजी मौजे नरखेड, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु तिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नरखेड, ता.मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी ऋतुजा अशोक गोटणे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नरखेड यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. ९/१/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण कि.अर्ज नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

अविनाश दत्तात्रय राऊ त
रा. नरखेड ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**
विरूद्ध
ग्रापंचायत नरखेड ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा अविनाश दत्तात्रय राऊ त जन्म दि.१९/१२/१९९३ रोजी नरखेड ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला अविनाश दत्तात्रय राऊत यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे डिसेंबर १९९३ चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२३/१२/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे
ता. ९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण कि.अर्ज नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

सारिका विलास पवार
रा.गोटेवाडी ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूद्ध**
ग्रापंचायत गोटेवाडी ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा सारिका विलास पवार जन्म दि.१/४/१९९४ रोजी गोटेवाडी ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला सारिका विलास पवार यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९९४ चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२३/१२/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/१२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | ८ | | ■ | ९ | | ■ | |
| १० | | | ■ | ■ | ११ | | ■ | ■ | १२ | १३ | ■ |
| | ■ | १४ | १५ | ■ | ■ | ■ | १६ | १७ | | | ■ |
| ■ | १८ | ■ | १९ | २० | ■ | २१ | | | ■ | २२ | २३ |
| २४ | | ■ | ■ | २५ | २६ | | | ■ | २७ | ■ | |
| | ■ | २८ | | | | ■ | | | २९ | ३० | |
| ३१ | | | ■ | | ■ | ३२ | | ३३ | | | ■ |
| | ■ | ३४ | ३५ | ■ | ३६ | | ■ | | ■ | ३७ | ३८ |
| | ■ | ३९ | | | | ■ | ■ | | ■ | ४० | |
| ■ | ४१ | ■ | | ■ | | ■ | ४२ | | ■ | ■ | |
| ४३ | | | | | | ■ | | ■ | ४४ | | |

**उभे शब्द :** १) भागाकारच्या विरूध्दार्थी शब्द २) तलाव, पाण्याचा साठा असलेली जंगलातील जागा ३) वाईट, डावा ४) मनातील उत्साह ५) दात घासण्यासाठी वापरतात ती एक प्रख्यात टूथपेस्ट ६) पतीची आई ८) एक श्वसनरोग १३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनला आहे १५) मोठा तीळ १६) भाजप पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आडनाव १७) सल उलट लिहा १८) मुलाची मुलगी २०) फोटो (हिंदीत) २१) पुण्यच्या विरूध्दार्थी शब्द २३) पाणी पिण्याची तीव्र इच्छा २४) महाराष्ट्रातील लेण्यांसाठी प्रसिध्द असलेला जिल्हा २६) फळातील गोड द्रव २७) आईची बहीण २८) एक थोर संत ३०) स्वार्थ, हेतू ३२) मदनाची पत्नी ३३) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक ३५) देवतांनी दिलेला आशीर्वाद ३५) मानहानी करणे ३८) व्यायाम, मेहनत ४१) न बोलण्याचे घेतलेले व्रत ४२) पुरूषांच्या ओठावरील केस

**आडवे शब्द :** १) मराठी वर्षाच्या सुरूवातीचा येणारा सण ४) मराठी वर्षातील सुरूवातीचा महिना ५) हा उगळावा तितका काळाच, अशी एक म्हण आहे ७) सहाय्य ९) सब्र का ** मिठा होता है १०) पाठीवर कठीण आवरण असलेला एक उभयचर जीव ११) कबूल, ** असणे १२) खेळ (इंग्रजीत) १४) पक्का, न बदलाणारा निर्णय या अर्थाने १६) छ. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांचे माहेर १९) तीन आणि चार मिळून होणारी संख्या २१) हरिणाचे पिल्लू २२) पानाचा विडा याच्यामुळे रंगतो २४) शेतीची नांगर, पाभार ही अवजारे (ग्रामीण भाषेत) २५) जळण २८) सात गुणिले तीन २९) उलटी, ओकारी ३१) गाणे गाणारा ३२) रसाळ, रसयुक्त ३५) होडी, नौका ३५) एक म्हण-** तेथे माती ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) भीतीने थरथरणे, **** उडणे ४०) एसटीची प्रवासी गाडी ४२) गवंडीकाम वा इतर कामातील कुशल कारागीर ४३) ध्येय साध्य करण्यासाठी या गोष्टी पणाला लावाव्या लागतात-** ** ** ४४) राष्ट्रवादीचे एक नेते-*** पवार

## सुडोकु - 122

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 9 | | | | | 8 | 7 | 1 |
| 7 | 4 | 3 | | | | | 5 | |
| 5 | 8 | | | | | | 4 | 9 |
| | | 5 | 4 | 7 | | 1 | 3 | |
| | 7 | | | | 2 | | | |
| | 2 | 9 | | | | | | 4 |
| 6 | | | 9 | | 3 | 4 | | 7 |
| 4 | 3 | 2 | 6 | 8 | | | | |
| 9 | | | 2 | 5 | | 6 | | 3 |

# मोहिते-पाटलांची विजयाची हॅट्रिक की भाजपच्या पराभवाची?



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल जरी एका शहरापुरता मर्यादित असला तरी त्याचे राजकीय पडसाद संपूर्ण माळशिरस तालुक्यात उमटणार आहेत. या निवडणुकीतून धैर्यशील मोहिते-पाटील विजयाची हॅट्रिक नोंदवणार की राम सातपुते भाजपचा तिसरा पराभव थोपवून स्वतःची राजकीय घोडदौड कायम ठेवणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मोहिते-पाटलांनी गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपविरोधात दमदार विजय मिळवला. भाजप नाराज करूनही त्यांनी लोकसभा निवडणूक जिंकली आणि त्यानंतर माळशिरस विधानसभा निवडणुकीत राम सातपुते यांचा पराभव करून मोठा राजकीय डाव साधला. या दोन्ही निकालांमुळे तालुक्यात त्यांचे वर्चस्व वाढले.

आता अकलूज नगरपरिषद निवडणुकीतही मोहिते-पाटील विजयी झाले तर त्यांच्या नावावर विजयाची सलग हॅट्रिक नोंदवली जाईल. यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गट आणि भाज-दोघांनाही त्यांच्या ताकदीची नव्याने दखल घ्यावी लागणार आहे. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा कालावधी एप्रिलमध्ये संपत असून, अकलूजमधील विजयामुळे त्यांना पुन्हा मोठे पद मिळण्याची शक्यताही निर्माण होऊ शकते.

दुसरीकडे राम सातपुतेही या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरले आहेत. अकलूज जिंकले तर भाजप त्यांना अधिक बळ देत विधानपरिषदेसाठी संधी देऊ शकतो, अशी चर्चा आहे. आगामी पंचायत समिती निवडणुकीवरही या निकालाचा मोठा प्रभाव राहणार आहे. पंचायत समिती ताब्यात असणे म्हणजे तालुका ताब्यात असल्यासारखे मानले जाते आणि भविष्यातील आमदारकीचा पाया तेवढाच बळकट होतो.

मोहिते-पाटील आपल्या सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि पतसंस्थांच्या माध्यमातून तालुक्यावर प्रभाव टिकवून आहेत. तर सातपुते या संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मोहिते-पाटलांची ताकद कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. दोघांमध्ये तालुक्यातील सत्ता समीकरणांवर कब्जा मिळवण्यासाठी तीव्र संघर्ष सुरू आहे.

दरम्यान, अकलूज नगरपरिषद, महालुंग, माळशिरस आणि नातेपुते नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर तालुक्याच्या गट-गण रचनेत बदल झाला आहे. पूर्वी ११ गट व २२ गण असलेली रचना आता ९ गट व १८ गणांवर आली आहे.या सर्व पार्श्वभूमीवर अकलूज नगरपरिषदेचा निकाल केवळ स्थानिक नसून माळशिरस तालुक्याचे भविष्य ठरवणारा निर्णायक टप्पा** मानला जात आहे.

# शिवसेनेतर्फे प्रभाग १६ मध्ये विकासकामांचे भूमिपूजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या ३.५ कोटी रुपयांच्या विशेष निधीपैकी २५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन रविवारी प्रभाग क्र. १६ मध्ये करण्यात आले. नागरिकांसाठी सुविधावृद्धीचा हा महत्त्वाचा टप्पा असून भूमिपूजन सोहळ्यास शिवसेनेचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

गांधीनगर विणकर सोसायटीच्या समोरील मैदान परिसरात सुरू होणाऱ्या या विकासकामांचे भूमिपूजन शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहरप्रमुख सचिन चव्हाण, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख व संयोजक प्रियदर्शन साठे, संयोजक भीमा वाघमारे यांच्या हस्ते पार पडले. निधीच्या माध्यमातून परिसरात सार्वजनिक सुविधा, परिसर सुशोभीकरण आणि मूलभूत गरजांची पूर्तता करणारी कामे हाती घेतली जाणार आहेत. या प्रसंगी सोसायटीचे चेअरमन मारुती माळगे, तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमात राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, शहरप्रमुख सचिन चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करत विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रियदर्शन साठे यांनी तर सूत्रसंचालन अमोल सिताफळे यांनी केले. आभार प्रदर्शन भीमा वाघमारे यांनी मानले. यावेळी पंचाक्षर स्वामी, अभिजीत बळप, दीपक पाटील, शैलेश मारा, अल्फान आबादीराजे, शिवाजी साठे, निलेश आळगुंडगी, दत्तात्रय द्यावरकोंडा, खाटीक समाजाचे अध्यक्ष कांबळे, शितल परदेशी, धनंजय पाटील, किशोर चलवादी, अमित माकणी, पडळकर आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते. या भूमिपूजनामुळे परिसरातील विकासकामांना गती मिळून प्रभाग १६ मध्ये सुविधा वाढण्यास मदत होणार आहे.

# पंढरपूर बसस्थानक आगार घाणीच्या विळख्यात



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाने पंढरपुरात राज्यातील सर्वात मोठे बसस्थानक बांधले. परंतु या बसस्थानकात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. भाविकांना, प्रवाशांना सेवा-सुविधा मिळत नाहीत.

यामुळे तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. असे असतानाही या बसस्थानकाकडे मात्र परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

नुकतीच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोलापूर येथील बसस्थानकास भेट दिली होती. यावेळी त्यांना घाणीचे साम्राज्य दिसून आले. प्रवाशांना सुविधा मिळत नसल्याचे आढळून आले. यामुळे त्यांनी आगार प्रमुखांना स्वच्छता ठेवा व प्रवाशांना सुविधा द्या, अशा सूचना दिल्या होत्या. मात्र, याकडे आगार प्रमुखांनी दुर्लक्ष केले. याची गंभीर दखल घेऊन प्रताप सरनाईक यांनी आगार प्रमुखास निलंबित केले आहे. या घटनेमुळे राज्य परिवहन महामंडळामध्ये खळबळ उडाली आहे.

पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे याठिकाणी राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील सर्वात मोठे 28 प्लॅटफॉर्म असलेले बसस्थानक बांधले आहे. याठिकाणी दररोज एसटीच्या सुमारे 300 ते 400 फेऱ्या होतात. तसेच 30 हजारांहून अधिक भाविक पंढरपुरात दर्शनासाठी येतात. यामुळे याठिकाणी बसस्थानकात स्वच्छता व भाविकांना, प्रवाशांना सुविधा मिळणे गरजेचे आहे.

मात्र, याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यभरातून आलेले भाविक अस्वच्छता दिसत असल्याने पंढरपूरविषयी नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. यामुळे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पंढरपूर बसस्थानकास अचानक भेट देऊन पाहणी करावी, अशी मागणी प्रवासी व भाविकांतून होत आहे.

### प्रवेशद्वारात अस्वच्छता, दुचाकींची गर्दी

बसस्थानकात प्रवाशांना प्रवेश करण्यासाठी तीन प्रवेशद्वार आहेत. या तीनही प्रवेशद्वारांना संतांची नावे देण्यात आलेली आहेत. मात्र, या प्रवेशद्वारातच कचरा, तंबाखू, पान खाऊन मारलेल्या पिचकाऱ्यांनी प्रवेशद्वारात घाण साचत आहे. तर प्रवेशद्वारातच आणि समोरील गाळेधारकांच्या दुकानांच्या समोरच दुचाकी वाहने पार्क करण्यात येत असल्याने प्रवाशांना बसस्थानकात प्रवेश करताना अडथळ्याचे ठरत आहे. तर गाळेधारकांच्या दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांनादेखील नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे येथील स्वच्छता कायम ठेवावी आणि वाहनांची सोय पार्किंगमध्ये करण्यात यावी, अशी मागणी गाळेधारकांकडून करण्यात येत आहे.

# महात्मा फुले जन आरोग्य योजना : सर्वसामान्यांसाठी मोफत व गुणवत्तापूर्ण उपचारांची हमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियांचा लाभ मिळत आहे. या योजनेत प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. 5 लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असून एकूण 1356 प्रकारच्या उपचारांचा समावेश आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी स्वतंत्रपणे रु. 4.5 लक्ष पर्यंतचे संरक्षण दिले जाते. तसेच रस्ते अपघातग्रस्तांना प्रति व्यक्ती, प्रति अपघात रु. 1 लक्ष पर्यंतचा लाभ मिळतो, अशी माहिती या योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारक, अधिवास प्रमाणपत्रधारक, बांधकाम कामगार, पत्रकार, अपंग, अनाथ आश्रम व वृद्धाश्रमातील रहिवासी, तसेच महिला व बालविकास विभागाच्या वसतिगृहातील लाभार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

या योजने अंतर्गत कॅन्सर, हृदयविकार, यकृत व मूत्रपिंड विकार, मेंदू व मज्जासंस्था, नवजात बालकांचे आजार, अपघातातील शस्त्रक्रिया, हाडांचे विकार, स्त्रीरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, फुफ्फुस व पचनसंस्थेचे आजार, मानसिक आजार हृदयविकारासंबंधीत शस्त्रक्रिया एन्जोप्लास्टी बायपास सर्जरी व किडनी संदभार्तील मुतखडे प्रोस्टेट ग्रंथीचे आजार व डायलिसिस अशा एकूण १३५६ उपचारांचा लाभ घेता येतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, शिधापत्रिका, अधिवास दाखला, ओळखपत्र, शाळा दाखला किंवा पत्रकारिता आयोगाचा दाखला आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा १५५३८९ / १८००२३३२२०० या निःशुल्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आव्हान श्री. गुंजाळ यांनी केले.

**योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या आजारांवरील उपचार :**

**हृदयविकार :-** हृदयाचा झटका, अँजिओप्लास्टी, बायपास, हृदयाला होल असलेले.

**किडनीचे आजार :-** किडनी स्टोन, प्रोस्टेट.

**हाडांचे सर्व आजार :-** हाड मोडलेले वगैरे.

**मेंदूचे विकार :-** पक्षाघात (लकवा मारणे), मेंदूला रक्तपुरवठा कमी होणे, मेंदूत रक्तस्त्राव व त्यावरील शस्त्रक्रिया.

**कॅन्सर :-** रेडिओलॉजी शस्त्रक्रिया, केमोथेरपी या योजनेमार्फत मोफत उपचार केले जातात.

**जनरल मेडिसिन :-** साप चावलेले रुग्ण, विष प्राशन केलेले रुग्ण, डीप व्हेन थ्रोम्बोसिस.

# अमोल शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त स्नेहमेळावा उत्साहात पार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माजी विरोधी पक्षनेते व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त थोरला मंगळवेढा तालीम यांच्या वतीने सत्कार समारंभ व स्नेह गाठी-भेटींचे आयोजन करण्यात आले.

अमोल शिंदे यांनी तळागाळातील जनतेशी सातत्याने संपर्क ठेवत केलेल्या विकासकामांमुळे कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिकांनी उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला.

या प्रसंगी आ. विजयकुमार देशमुख, शिवसेना प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, माजी आमदार दिलीप माने, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, संकेत पिसे, शिवसेना



स्नेह गाठी-भेटी उबाटा गटाचे सहसंपर्क प्रमुख पुरुषोत्तम बरडे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, माजी परिवहन समितीचे सभापती राजन जाधव, अनिकेत पिसे, विनोद भोसले, चंद्रकांत वानकर, दिलीप कोल्हे, आबासाहेब थोरात, मतीन बागवान, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, राष्ट्रवादी कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माजी नगरसेवक किसन जाधव यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व उद्योजक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात अमोल शिंदे यांचा गौरव करण्यात आला असून वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवर व नागरिकांनी त्यांना यशस्वी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नागनाथ विद्यालय सुंदर शाळामध्ये तृतीय

**पोखरापूर(कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा ०.२ अंतर्गत २०२२ - २३ मध्ये झालेल्या नागनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, मोहोळ स्पर्धेत मोहोळ येथील नागनाथ विद्यालयाने तालुक्यातून तृतीय क्रमांक मिळवत एक लाख रकमेचे रोख पारितोषिक पटकाविले. सन १९५० मध्ये स्थापन झालेली ही शाळा अत्यंत जुनी अशी शिक्षण संस्था आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रात ही या शाळेने राष्ट्रीय स्तरापर्यंत झेप घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव देऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करून सर्व क्षेत्रांमध्ये विद्यार्थी पाठविण्याचे काम या शाळेमुळे झाले. मुख्याध्यापक बी. एन.




बागवान म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबर सर्व शिक्षक व विद्यार्थांनी सर्वच टप्पे पार करत यश मिळविले. या पारितोषिकाची रक्कम पंचायत समितीकडून शाळेकडे नुकतीच जमा झाली आहे. संस्थेचे प्रशासक तथा जिल्हा सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी विद्यालयाचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या शिरपेचात या पुरस्कारामुळे मानाचा तुरा खोवला आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राष्ट्रवादीकडून अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त पार्क चौक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून अभिवादन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवक कार्यकर्ते तसेच नागरिकांची उपस्थिती होती. या वेळी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या महापुरुषार्थ, संविधाननिर्मितीतील मोलाच्या योगदानाची आठवण करण्यात आली.

पार्क चौक परिसरात 'जय भीम' घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि लोकशाही मूल्यांचे स्मरण करून ते समाजपरिवर्तनासाठी मार्गदर्शक राहतील असे जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांनी सांगितले.



या अभिवादन कार्यक्रमा प्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आनंद चंदनशिवे, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, प्रा.श्रीनिवास कोंडी, जेष्ठ नेते दत्ता गायकवाड, माजी नगरसेवक गणेश पुजारी, प्रदेश सरचिटणीस शशिकांत बापू कांबळे, OBC सेल विभाग प्रदेश उपाध्यक्ष बसवराज बगले, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भरत साबळे, VJNT सेल विभाग अध्यक्ष रुपेशकुमार भोसले, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, युवक संघटक दत्तात्रय बडगंची, मध्य विधानसभा अध्यक्ष अल्मेहराज आबादीराजे, दक्षिण विधानसभा कार्याध्यक्ष प्रदीप भालशंकर, वाहतूक सेल विभाग अध्यक्ष इरफान शेख, शहर सचिव दत्तात्रय बनसोडे, निशांत तारानाईक, शहर सरचिटणीस प्रज्ञासागर गायकवाड, शहर उत्तर विधानसभा कार्याध्यक्ष प्रकाश झाडबुके, सूर्यकांत शेरखाने, महिपती पवार, प्रवीण गाडे विधीज्ञ सेल शहराध्यक्ष ॲड. जयप्रकाश भंडारे, सद्दाम रंगरेज, अर्चना दुलंगे, उमादेवी झाडबुके, शोभा सोनवणे, प्रियंका पवार, यांच्यासह पक्षाचे सर्वच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नातं आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापूर

**पाहिजेत**
दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल
सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षांपर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

मो.9657069069
संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौंन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.